ePaper

## इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांची प्रकृती गंभीर



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 10 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

पवना जलवाहिनीवरून मावळ पुन्हा पेटणार!

## आंदोलकांनी फेकला चिखल, पाण्याच्या बाटल्या आणि चपला

# ममता बॅनर्जींच्या ताफ्यावर हल्ला

**महाईन्यूज ।**
**पश्चिम बंगाल**

**पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या ताफ्यावर आंदोलन करत असलेल्या जमावाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना आज राज्यातील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील हलिशहर येथे घडली. ममता बॅनर्जी ह्या तृणमूल काँग्रेसच्या मृत्यू झालेल्या एका कार्यकर्त्याच्या घरी जात असताना संतप्त जमावाने त्यांचा ताफा अडवून हा हल्ला केला.**



याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार ममता बॅनर्जी ह्या पोलीस कोठडीत संशयास्पदरीत्या मृत्यू झालेल्या तृणमूल काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी जात असताना हा हल्ला झाला. आंदोलकांनी माजी मुख्यमंत्री असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या वाहनाला चहुबाजूंनी घेरून त्यावर चिखल, पाण्याच्या बाटल्या आणि चपला फेकल्या. तसेच संतप्त जमावाने यावेळी जोरदार घोषणाबाजीही केली. परिस्थिती बिघडत असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत ममता बॅनर्जी यांना या परिसरातून बाहेर काढले.

पश्चिम बंगालमध्ये गेल्या काही दिवसांपासून मोठ्या घडामोडी सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी टीएमसीचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या ताफ्यावर हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे पश्चिम बंगालमध्ये पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे.

यावेळी ममता बॅनर्जी यांच्या वाहनांवर दगड आणि चिखल व चपला फेकण्यात आल्याचा आरोप टीएमसीकडून करण्यात आला आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या घटनेवेळी नागरिकांनी 'चोर, चोर' अशी जोरदार घोषणाबाजी केल्याची माहिती सांगितली जात आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

दरम्यान, याआधी तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाल्याची घटना घडली होती. तसेच तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्यावरही हल्ला झाल्याची घटना घडली होती.

> "माझ्या गाडीवर दगड, शूज आणि चिखल फेकून हल्ला करण्यात आला आहे. हा पूर्णपणे एक कट आहे. मी येथे येत असल्याची पूर्वकल्पना पोलिसांना दिली होती; तरीही पोलिसांनी सुरक्षेच्या आवश्यक त्या कोणत्याच उपाययोजना केल्या नाहीत. सध्या संपूर्ण पश्चिम बंगालवर गुंडांचे राज्य सुरू आहे. अशा प्रकारच्या घटना याआधी मी कधीही पाहिल्या नाहीत. सध्या पश्चिम बंगालमध्ये हे काय चाललंय? पोलीस फक्त भाजपाला संरक्षण देत आहेत"
>
> **- ममता बॅनर्जी, माजी मुख्यमंत्री, पश्चिम बंगाल.**

## नेमकं घटना काय घडली?

पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या उत्तर २४ परगणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होत्या. यावेळी तृणमूल काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याच्या घरी भेट घेण्यासाठी ममता बॅनर्जी दाखल झाल्या होत्या. मात्र, यावेळी काही जणांनी ममता बॅनर्जी यांच्या ताफ्याचा मार्ग अडवण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या ताफ्यावर दगडफेक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## ममता म्हणाल्या, मोठमोठे दगड फेकले, डोकं फुटलं असतं...

या हल्ल्यानंतर ममता बॅनर्जी यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी सांगितले की, काही समाजकंटकांनी माझ्या वाहनावर मोठमोठे दगड फेकले. हा हल्ला एवढा भयंकर होता की, जर कारच्या काचा उघड्या असत्या तर माझं डोकं फुटलं असतं. तसेच कारमधील सर्वजण मारले गेलो असतो.

माझ्या संपूर्ण जीवनात असला प्रकार मी कधी पाहिला नाही. तसेच हा संपूर्ण हल्ला पोलिसांच्या उपस्थितीत झाला, असे सांगत ममता बॅनर्जी यांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था तसेच पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच राज्यातील पोलीस प्रशासन हे भाजपाला सुरक्षा देण्याचं काम करत आहे, असा आरोपही ममता बॅनर्जी यांनी केला.

# पुणे-नाशिक रेल्वेसाठी चाकणमध्ये चक्काजाम!

## मूळ मार्ग पूर्ववत करण्याची मागणी; आंदोलक-पोलिसांमध्ये जोरदार झटापट

महाईन्यूज । पुणे

**पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मूळ मार्ग पूर्ववत करावा, या मागणीसाठी क्रांती दिनाचे औचित्य साधून रविवारी उत्तर पुणे जिल्ह्यात विविध ठिकाणी चक्काजाम आंदोलन करण्यात आले. चाकण येथील तळेगाव चौकात खेडचे आमदार बाबाजी काळे यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय आंदोलन झाले. पुणे-नाशिक महामार्ग रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी बळाचा वापर करून रोखल्याने सुमारे १५ मिनिटे आंदोलक आणि पोलिसांमध्ये झटापट झाली.**




माणिक चौकातून महामार्गाच्या दिशेने निघालेल्या आंदोलकांना पोलिसांनी तळेगाव चौकात रोखले. यावेळी अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले. आमदार बाबाजी काळे यांनी आंदोलनस्थळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केल्यानंतर पोलिसांनी त्यांनाही बाजूला केले. आंदोलकांना महामार्गावरून हटविल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

आमदार काळे म्हणाले, "पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प सुमारे १६ हजार कोटी रुपयांचा आहे. जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील 'जीएमआरटी' दुर्बिणीला धोका असल्याचे कारण देत मूळ मार्ग बदलण्यात येत आहे. मात्र, पुणे-चाकण-राजगुरुनगर-मंचर-नारायणगाव-आळेफाटा-संगमनेर-सिन्नर-नाशिक हा मूळ मार्गच कायम ठेवावा."

मूळ मार्ग रद्द करून नाशिक-शिर्डी-पुणतांबा आणि अहिल्यानगर-चाकण या पर्यायी मार्गाचे सर्वेक्षण करण्यात येत असल्याने खेड, आंबेगाव, जुन्नर, संगमनेर आणि सिन्नर परिसरातील नागरिकांमध्ये असंतोष आहे. या मागणीसाठी चाकणपासून सिन्नरपर्यंत विविध ठिकाणी आंदोलने करण्यात आली.

या आंदोलनात भाजप, शिंदे गटाची शिवसेना, ठाकरे गटाची शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, तसेच विविध गावांचे सरपंच, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य सहभागी झाले होते.

### पुणे-नाशिक रेल्वेसाठी चाकणमध्ये चक्काजाम

मूळ मार्ग पूर्ववत करण्याच्या मागणीसाठी क्रांती दिनी चाकणच्या तळेगाव चौकात सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले. महामार्गावर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी रोखल्याने सुमारे १५ मिनिटे झटापट झाली. आमदार बाबाजी काळे यांच्यासह काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

### 'मूळ मार्गच कायम राहावा'

यावेळी आमदार बाबाजी काळे म्हणाले, "पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प सुमारे १६ हजार कोटी रुपयांचा आहे. जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील जागतिक दर्जाच्या 'जीएमआरटी' दुर्बिणीला धोका निर्माण होत असल्याचे कारण देत रेल्वे मंत्रालयाने मूळ मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला आहे."

# मयुरेश्वर मंदिराच्या पुरातन वारशाला धक्का नको : सुनेत्रा पवार

महाईन्यूज । बारामती

**श्री क्षेत्र मयुरेश्वर गणपती मंदिराचे पुरातन व धार्मिक महत्त्व जपत मंदिराचे मूळ स्वरूप अबाधित ठेवावे. प्राचीन वास्तूला धक्का न लावता आधुनिक सुविधांचा समन्वय साधून विकासकामे करावीत. मंजूर आराखड्यानुसार सर्व कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.**




### मयुरेश्वर मंदिराच्या वारशाला धक्का नको

मयुरेश्वर गणपती मंदिराचे पुरातन स्वरूप जपत विकासकामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिल्या. निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कठोर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकण्याचा इशाराही त्यांनी दिला. मंदिर परिसरातील स्वच्छता आणि पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याला प्राधान्य देण्याच्या सूचनाही करण्यात आल्या.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामती तालुक्यातील श्री क्षेत्र मयुरेश्वर गणपती मंदिर परिसर तसेच मेडद येथील स्व. अजितदादा पवार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या आणि प्रस्तावित विकासकामांचा आढावा घेतला.

मयुरेश्वर मंदिर परिसरातील कामांची पाहणी करताना त्यांनी मंदिराच्या जीर्णोद्धाराची कामे मंजूर आराखड्यानुसारच करण्याच्या सूचना दिल्या. मंदिर परिसर तसेच गाभाऱ्यातील स्वच्छतेला प्राधान्य देण्याबरोबरच पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होईल, याची दक्षता घेण्यास सांगितले. विकासकामे करताना ग्रामस्थांना विश्वासात घेऊन सातत्याने समन्वय ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

"विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही," असे स्पष्ट करत त्यांनी हलगर्जीपणा किंवा चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यानंतर सुनेत्रा पवार यांनी मेडद येथील स्व. अजितदादा पवार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाची पाहणी केली. महाविद्यालय परिसरातील रस्त्यांच्या विकासासाठी आवश्यक हद्दवाढीचा प्रस्ताव तातडीने मार्गी लावावा, तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि निवासाच्या सुविधांचा विचार करून महाविद्यालय व वसतिगृह पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, पंचायत समिती सभापती किरण तावरे, जिल्हा परिषद सदस्या रोहणी कदम (ढोले), नगराध्यक्ष सचिन सातव, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक विलास वहाने, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, तहसीलदार स्वप्नील रावडे, गटविकास अधिकारी किरण माने, मुख्याधिकारी पंकज भुसे, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल काळे, मोरगाव देवस्थानचे विश्वस्त देवराज डहाळे आदी उपस्थित होते. तत्पूर्वी उपमुख्यमंत्री पवार यांनी श्री क्षेत्र मयुरेश्वर गणपतीचे दर्शन घेतले.

# पवना जलवाहिनीवरून मावळ पुन्हा पेटणार!

## गोळीबाराला १५ वर्षे; शेतकऱ्यांचा विरोध कायम, राजू शेट्टींच्या आंदोलनाची घोषणा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाविरोधातील मावळ गोळीबाराला रविवारी १५ वर्षे पूर्ण झाली. ९ ऑगस्ट २०११ रोजी झालेल्या पोलिस गोळीबारात तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेच्या आठवणी आजही मावळातील शेतकऱ्यांच्या मनात ताज्या असून, पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाला विरोध कायम आहे. दरम्यान, प्रकल्प पुन्हा मार्गी लावण्यासाठी शासनस्तरावर हालचाली सुरू असल्याचा आरोप शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.**



### पवना जलवाहिनीविरोधात पुन्हा रणशिंग!

मावळ गोळीबाराला १५ वर्षे पूर्ण झाली तरी पवना बंदिस्त जलवाहिनीविरोधातील शेतकऱ्यांचा संघर्ष कायम आहे. प्रकल्पाच्या प्रशासकीय हालचालींना विरोध करत राजू शेट्टी यांनी २ ऑक्टोबरला लॉंगमार्चची घोषणा केली असून, जलसमाधी आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून पवना धरणातून बंद जलवाहिनीद्वारे पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करण्याचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला होता. मात्र, भारतीय किसान संघासह स्थानिक शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध केला. ९ ऑगस्ट २०११ रोजी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बौर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनाला हिंसक वळण लागल्यानंतर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात कांताबाई ठाकर, मोरेश्वर साठे आणि शामराव तुपे या तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला, तर अनेक आंदोलक जखमी झाले.

या घटनेनंतर राज्य शासनाने प्रकल्पाला स्थगिती दिली. मात्र, सुमारे १२ वर्षांनंतर स्थगिती उठविण्यात आल्याने मावळात पुन्हा संतापाची लाट निर्माण झाली. प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी वडगाव मावळ येथे सर्वपक्षीय आंदोलनही झाले.

दरम्यान, पवना धरणग्रस्तांचे पुनर्वसन आणि जलवाहिनी प्रकल्प रद्द करण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी आंदोलनाची घोषणा केली आहे. २ ऑक्टोबर रोजी लॉंगमार्च काढण्यात येणार असून, पवना धरणात जलसमाधी आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय निर्णय घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र, बैठका सुरू असतानाच प्रशासकीय प्रक्रिया पुढे नेली जात असल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे. त्यामुळे १५ वर्षांनंतरही पवना जलवाहिनीचा संघर्ष कायम असून, शासनाच्या पुढील भूमिकेकडे मावळचे लक्ष लागले आहे.

### शेतकऱ्यांना बैठकीत गुंतवून प्रक्रिया पुढे?

पवना बंदिस्त जलवाहिनीबाबत शेतकऱ्यांशी बैठका सुरू असतानाच प्रशासकीय प्रक्रिया वेगाने सुरू असल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे. त्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत मावळातील शेतकऱ्यांमध्ये पुन्हा अस्वस्थता निर्माण झाली आहे.

# डी-मार्टमध्ये बाप-लेकाची चोरीची ‘शक्कल’ फसली...




**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**खरेदीच्या बहाण्याने चिंचवड येथील डी-मार्टमध्ये प्रवेश करून ट्रॉलीतील महागड्या वस्तूंचे बिल न भरता त्या चोरून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या बाप-लेकाचा डाव सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे फसला. दोघांकडून ७ हजार ४०३ रुपये किमतीच्या वस्तू जप्त करण्यात आल्या. गुरुवारी (दि. ६) रात्री साडेआठच्या सुमारास हा प्रकार घडला.**

### डी-मार्टमध्ये बाप-लेकाचा चोरीचा डाव फसला

चिंचवड येथील डी-मार्टमध्ये ७ हजार ४०३ रुपयांच्या वस्तूंचे बिल न भरता बाहेर पडण्याचा प्रयत्न करणाऱ्या बाप-लेकाला सुरक्षा कर्मचाऱ्यांनी पकडले. तपासणीत चोरीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर दोघांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

या प्रकरणी डी-मार्टचे कर्मचारी रवी भिकाजी खंडाळकर (वय ४३, रा. रहाटणी लिंक रोड, थेरगाव) यांनी तक्रार दिली आहे.




त्यानुसार संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात सचिन वसंत वाघमारे (वय ४५) आणि त्यांचा मुलगा आयुष सचिन वाघमारे (वय १८, दोघेही रा. साईनगर, गहुंजे, देहूरोड) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवारी रात्री डी-मार्टमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होती. याचा फायदा घेत आरोपी बाप-लेकाने मॉलमधून विविध वस्तू ट्रॉलीमध्ये घेतल्या. त्यानंतर काही वस्तूंचे बिल न भरता त्या घेऊन बाहेर पडण्याचा प्रयत्न केला.

मात्र, एक्झिट गेटजवळील कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकांना त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. त्यांनी दोघांना थांबवून ट्रॉलीतील साहित्य आणि बिलाची तपासणी केली. त्यावेळी ७ हजार ४०३ रुपयांच्या वस्तूंचे बिल भरले नसल्याचे समोर आले.

### नक्की काय घडले?

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्रीच्या वेळी चिंचवड येथील डी-मार्टमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होती. याचा फायदा घेत आरोपी सचिन वाघमारे आणि त्याचा १८ वर्षांचा मुलगा आयुष यांनी मॉलमधून विविध वस्तू ट्रॉलीमध्ये घेतल्या. त्यानंतर सर्व वस्तूंचे रीतसर बिल न भरता, काही वस्तू लपवून किंवा न भरलेल्या बिलाच्या वस्तू चोरून बाहेर पडण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र, एक्झिट गेटजवळ असलेल्या कर्मचाऱ्यांना आणि सुरक्षा रक्षकांना त्यांच्या संशयास्पद हालचालींवर शंका आली. त्यांनी दोघांना रोखून त्यांच्याकडील बिल आणि ट्रॉलीतील साहित्याची पडताळणी केली. तपासात तब्बल ७,४०३ रुपयांच्या विविध वस्तूंचे बिल भरले नसल्याचे उघडकीस आले. मॉल प्रशासनाने तात्काळ संत तुकाराम नगर पोलिसांना पाचारण करून दोन्ही आरोपींना पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेमुळे डी-मार्ट आणि परिसरातील व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली असून, संत तुकाराम नगर पोलीस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.

मॉल प्रशासनाने तातडीने संत तुकाराम नगर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले असून, या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे चोरीचा प्रयत्न उधळल्याने परिसरातील व्यापाऱ्यांमध्येही या घटनेची चर्चा सुरू आहे.



## भूमिका

**झोप ही माणसाच्या जीवनातील सर्वात मूलभूत गरजांपैकी एक. शरीराला विश्रांती देण्याबरोबरच मेंदू, स्मृती आणि मनाच्या आरोग्यासाठीही ती अत्यावश्यक आहे. तरीही आधुनिक जगात झोपेकडे जणू वेळेचा अपव्यय म्हणून पाहिले जात आहे. 'नेटफ्लिक्स'ने काही वर्षांपूर्वी झोपेला आपला 'सर्वात मोठा शत्रू' म्हटले होते.**

# झोप उडवणाऱ्या जगात आपण सारे नवे कुंभकर्ण!



हे विधान केवळ एका कंपनीचे नव्हे, तर २४ तास उत्पादन आणि उपभोग सुरू ठेवू पाहणाऱ्या व्यवस्थेचे मानसिकता स्पष्ट करणारे आहे. आज माणूस कामासाठीच नव्हे, तर मनोरंजनासाठीही जागा ठेवतो. रात्री उशिरापर्यंत ओटीटीवरील मालिका पाहणे, मोबाईलवर चॅटिंग करणे, समाजमाध्यमांवर स्क्रोल करत राहणे, व्हिडीओ पाहत राहणे या सवयींनी रात्रीचा निवांतपणा हिरावून घेतला आहे.

आपल्याला झोपायचे असते; पण डिजिटल जगाला आपले लक्ष सतत जागे ठेवायचे असते. त्यामुळे झोपेचा वेळच नव्हे, तर झोपेची गुणवत्ताही खालावत आहे. जागतिक पातळीवर प्रत्येक ठिकाणी झोपेचा कालावधी कमी झाला आहे, असे ठामपणे म्हणता येत नसले तरी गाढ आणि समाधानकारक झोपेच्या तक्रारी वाढत आहेत. वारंवार जाग येणे, गाढ झोप न लागणे, सतत स्वप्ने पडणे किंवा पुरेशी झोप घेतल्यानंतरही ताजेतवाने न वाटणे, ही आधुनिक जीवनशैलीची गंभीर लक्षणे आहेत. चांगली झोप मेंदूच्या आरोग्यासाठी आणि स्मृतींच्या योग्य साठवणीसाठी महत्त्वाची असल्याचे आधुनिक विज्ञानही सांगते.

भारतीय परंपरेत निद्रेला केवळ शरीराची विश्रांती मानलेले नाही. जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती अशा अवस्थांमधून मानवी चेतनेचा प्रवास सांगितला जातो. सुषुप्ती म्हणजे गाढ झोप—जिथे बाह्य जगाशी असलेले भेद काही काळ विसरले जातात. अशा झोपेतून मन आणि शरीर नव्याने सावरतात.

इथेच कुंभकर्णाचे उदाहरण महत्त्वाचे ठरते. पुराणकथेत त्याची प्रचंड शक्ती निष्प्रभ करण्यासाठी त्याला निद्रेच्या अधीन केले जाते. आज परिस्थिती उलटी आहे. आधुनिक बाजारव्यवस्था आपल्याला झोपू न देता सतत जागे, उत्तेजित आणि ग्राहक बनवून ठेवू पाहते. आपले लक्ष, वेळ आणि भावना यांचेही आता बाजारमूल्य ठरले आहे. आपण त्यामुळे 'नवे कुंभकर्ण' झालो आहोत; मात्र फरक एवढाच की कुंभकर्णाला झोपवले जात होते, तर आपल्याला जागे ठेवले जात आहे. आपल्याला सतत नवा आशय, नवे संदेश, नवी माहिती आणि नवे मनोरंजन देऊन आपल्या झोपेवर आक्रमण केले जात आहे.

झोपेचा त्याग हा प्रगतीचा मापदंड असू शकत नाही. उलट, निरोगी समाजासाठी कामाइतकीच विश्रांतीही आवश्यक आहे. म्हणूनच मोबाईल बाजूला ठेवण्यापासून ते कामाच्या वेळेच्या मर्यादा निश्चित करण्यापर्यंत प्रत्येकाने आपल्या झोपेचे स्वातंत्र्य जपणे गरजेचे आहे. झोप ही आळशीपणाची खूण नाही; ती पुढच्या दिवसासाठीची ऊर्जा आहे. त्यामुळे आधुनिक 'कुंभकर्ण' होण्यापूर्वी आपल्या निद्रेच्या हक्कासाठी आपणच जागे होणे आवश्यक आहे.

## प्रासंगिक »

### उद्योगप्रियता महत्त्वाची

**एकदा काही परदेशी वार्ताहर महात्मा गांधीजींची मुलाखत घेण्यासाठी साबरमती आश्रमात आले. गांधीजींसमोर बसून ते विविध प्रश्न विचारत होते. गांधीजी शांतपणे त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देत होते आणि वार्ताहर त्याची टिपणे घेत होते.**

मुलाखत संपल्यानंतर सर्वजण गांधीजींचा निरोप घेऊन निघण्याच्या तयारीत होते. त्यातील एका वार्ताहराने गांधीजींना विनंती केली, "बापू, आपण आमच्या देशात जरूर या. आपल्या कार्यासाठी आम्ही भरपूर पैसा जमा करू. त्यामुळे आपल्या समाजसेवेच्या कार्याला मोठी मदत होईल." गांधीजी हसून म्हणाले, "माझ्या कार्यासाठी पैशांची कमतरता नाही. मी तुमच्या देशात नक्की येईन; पण पैसे गोळा करण्यासाठी नव्हे."

वार्ताहराला आश्चर्य वाटले. गांधीजी पुढे म्हणाले, "तुमच्या देशातील लोक कष्टाळू आहेत. ते सतत काही ना काही उद्योग करतात आणि स्वावलंबी जीवन जगतात. तुमच्या देशाची श्रीमंती मला आकर्षित करत नाही; मात्र तुमची उद्योगप्रियता आणि स्वावलंबन मला नक्कीच आवडते." गांधीजींचे विचार ऐकून सर्वांना जाणवले की, केवळ पैसा असणे ही खरी श्रीमंती नाही.

- तात्पर्य : सतत कष्ट करून उद्योगी व स्वावलंबी राहणे, हीच खरी श्रीमंती.

बांगलादेशातील राजकीय उलथापालथीला दोन वर्षे पूर्ण होत असतानाच शेख हसीना यांच्या भारतातून केलेल्या वक्तव्याने दक्षिण आशियातील राजकारण पुन्हा ढवळून निघाले आहे.

# हसीनांच्या वक्तव्याने भारतापुढे नवे आव्हान!

५ ऑगस्ट २०२४ रोजी अभूतपूर्व जनक्षोभामुळे सत्तेतून पायउतार झालेल्या हसीना यांनी भारतात आश्रय घेतला. त्यानंतर बांगलादेशात मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला. अवामी लीगशी संबंधित व्यक्तींना लक्ष्य करण्यात आले, तर हिंदूंसह अल्पसंख्याकांनाही त्याची झळ बसली.

आता हसीना यांनी मायदेशी परतण्याची तयारी दर्शवली आहे. तुरुंगवास किंवा मृत्युदंडाची भीती असली तरी आपल्या लोकांसाठी परतणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या भूमिकेने ढाकातील नव्या सत्ताधाऱ्यांची नाराजी ओढवून घेतली आहे. भारताच्या भूमीवरून बांगलादेशच्या अंतर्गत राजकारणावर अशा प्रकारची आक्रमक वक्तव्ये होणे, हा बांगलादेशच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न असल्याचे तेथील सरकारचे म्हणणे आहे.

या तणावाचे पडसाद हिंसक स्वरूपातही उमटले. हसीना यांच्या पत्रकार परिषदेला उपस्थित



असलेल्या अवामी लीगच्या माजी खासदार शाकिब अल हसन यांच्या निवासस्थानावर हल्ला झाला. त्यामुळे बांगलादेशातील राजकीय संघर्ष अजूनही संपलेला नाही, हे स्पष्ट झाले.

भारतासाठी ही परिस्थिती अत्यंत संवेदनशील आहे. हसीना यांना आश्रय देणे हा भारताचा मानवी दृष्टिकोन असला, तरी त्याच वेळी बांगलादेशातील नव्या लोकनियुक्त सरकारशी संबंधही सांभाळावे लागणार आहेत. ढाक्यात भारतविरोधी भावना वाढत असताना हसीना यांना भारतातून राजकीय भूमिका मांडण्याची मुभा मिळणे ही भारतासाठी मुत्सद्देगिरीची मोठी अडचण ठरू शकते. दुसरीकडे, हसीना यांच्या राजवटीचे समर्थन करणेही भारतासाठी योग्य ठरणार नाही. त्यांच्या दीर्घ सत्ताकाळातील लोकशाहीविषयक प्रश्न, विरोधकांवरील कारवाई आणि आंदोलकांच्या मृत्यूचे आरोप दुर्लक्षित करता येणार नाहीत. बांगलादेशातील प्रत्येक राजकीय घडामोडीकडे केवळ भारताच्या हिताच्या चष्म्यातून पाहण्यापेक्षा तेथील जनतेच्या लोकशाही आकांक्षांचाही विचार करावा लागेल.

चीनचा वाढता प्रभाव ही आणखी एक चिंता आहे. बांगलादेशातील विविध राजकीय गटांशी चीनचे संबंध आहेत. त्यामुळे भारताने ढाक्याशी संवादाचे मार्ग खुले ठेवणे आणि चीनला मिळणारी रणनीतिक मोकळीक कमी करणे आवश्यक आहे. बांगलादेश हा भारताचा शेजारीच नव्हे, तर सुरक्षा, व्यापार, सीमा आणि ईशान्य भारताच्या स्थैर्याशी थेट जोडलेला देश आहे. त्यामुळे हसीना यांचा प्रश्न केवळ एका माजी पंतप्रधानांच्या भवितव्याचा नाही. मानवी आश्रय, लोकशाही मूल्ये, राष्ट्रीय सुरक्षा आणि शेजारी देशाशी मैत्रीपूर्ण संबंध यांचा समतोल साधणे ही भारतापुढील खरी कसरत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



महारासि सिवे ।
कोपे ब्राम्हण तो नव्हे ॥१॥

तया प्रायश्चित्त कांहीं ।
देहत्याग करितां नाहीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बारामती विमानतळावर पुन्हा विमान थरार!

## सरावातील विमान धावपट्टीबाहेर; दोघे बचावले, डीजीसीएकडून चौकशी

**महाईन्यूज । बारामती**

**बारामती विमानतळावर रविवारी दुपारी एका खासगी कंपनीचे प्रशिक्षणार्थी विमान धावपट्टीवरून घसरल्याची घटना घडली. उड्डाणाच्या सरावादरम्यान विमानाचा वेग वेळेत नियंत्रित न झाल्याने ते धावपट्टीची हद्द ओलांडून बाहेर गेले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. विमानातील ट्रेनी पायलट आणि प्रशिक्षक दोघेही सुरक्षित असून, विमानाचे किरकोळ नुकसान झाले आहे.**



ही घटना दुपारी सुमारे १२.३५ वाजता बारामती विमानतळ परिसरात घडली. मिळालेल्या माहितीनुसार, विमानाने उड्डाणाच्या सरावासाठी रनवेवर प्रवेश केला होता. यावेळी 'रिजेक्टेड टेक-ऑफ'चा सराव करण्यात येत होता. रनवे २९ आणि त्यानंतर रनवे ११ वरून उड्डाण रद्द करण्याचा सराव करण्यात आला.

सरावादरम्यान विमानाचा वेग अपेक्षित प्रमाणात कमी करता न आल्याने ते वेळेत थांबवता आले नाही. परिणामी विमानाने रनवे २९ ची हद्द ओलांडून धावपट्टीबाहेर घसरले. सुरक्षा यंत्रणा आणि विमानातील दोघांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला.

घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी पाहणी केली. या अपघाताची चौकशी करण्याचे आदेश नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) दिले आहेत. चौकशीनंतर अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

### बारामतीत विमान अपघातांची मालिका

बारामती विमानतळ परिसरात यापूर्वीही विमान अपघाताच्या घटना घडल्या आहेत. १३ मे २०२६ रोजी गोजुबावी गावाच्या हद्दीत 'रेडबर्ड' कंपनीचे प्रशिक्षणार्थी विमान कोसळले होते. त्या वेळी प्रशिक्षणार्थी वैमानिक बचावला होता. जानेवारी २०२६ मध्ये याच विमानतळावर चार्टर विमानाच्या भीषण अपघातात तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे रविवारी झालेल्या या घटनेमुळे बारामती विमानतळावरील विमान सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# बुलढाण्यात सणासुदीत काजूकतलीत बुरशी, जिवंत अळ्या!



**महाईन्यूज । बुलढाणा**

**सणासुदीच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा शहरात ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणारा संतापजनक प्रकार समोर आला आहे. शहरातील रिलायन्स मॉलमधून खरेदी केलेल्या 'सीताश्री-लक्ष्मीनारायण' कंपनीच्या काजूकतलीच्या बॉक्समध्ये बुरशी आणि जिवंत अळ्या आढळल्याने खळबळ उडाली आहे. ब्रँडेड मिठाईच्या नावाखाली ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, एका ग्राहकाने रिलायन्स मॉलमधून संबंधित कंपनीची काजूकतली खरेदी केली होती. घरी बॉक्स उघडल्यानंतर मिठाईवर मोठ्या प्रमाणात बुरशी साचल्याचे दिसून आले. त्यानंतर काजूकतलीवर जिवंत अळ्या वळवळताना आढळल्याने ग्राहकाला धक्काच बसला. संबंधित उत्पादनाचा बॅच/बारकोड क्रमांक ८९०६१५१४२२०१७ असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर ग्राहकाने तातडीने अन्न व औषध प्रशासनाकडे (एफडीए) तक्रार केली. तक्रारीची गंभीर दखल घेत एफडीएच्या पथकाने रिलायन्स मॉलमध्ये जाऊन संबंधित मिठाईची पाहणी केली.

अन्न सुरक्षा अधिकारी जी. के. वसावे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने काजूकतलीचे नमुने ताब्यात घेतले असून ते प्रयोगशाळेतील तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. याशिवाय मॉलमध्ये उपलब्ध असलेल्या इतर मिठाई व अन्नपदार्थांच्या साठ्याचीही तपासणी करण्यात येत आहे.

सणासुदीच्या काळात मिठाईची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. त्यामुळे दूषित अन्नपदार्थ ग्राहकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतात. या प्रकरणात संबंधित उत्पादक कंपनी आणि विक्रेत्यावर कायदेशीर कारवाई होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### सणासुदीच्या काळात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

मोठमोठ्या मॉल्स आणि नामांकित ब्रँड्सवर नागरिक डोळे झाकून विश्वास ठेवतात. मात्र, अशा प्रकारचा दूषित आणि विषारी अन्नसाठा विकला जात असल्याने ग्राहकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित मॉल आणि मिठाई उत्पादक कंपनीवर एफडीए प्रशासन कडक कायदेशीर कारवाई करणार का, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### नेमका काय घडला प्रकार?

मिळालेल्या माहितीनुसार, एका ग्राहकाने बुलढाण्यातील रिलायन्स मॉलमधून 'सीताश्री-लक्ष्मीनारायण' कंपनीचा काजूकतलीचा बॉक्स खरेदी केला होता. घरी जाऊन हा बॉक्स उघडला असता, त्यातील मिठाईवर मोठ्या प्रमाणावर बुरशी साचलेली दिसून आली. एवढेच नाही तर काजूकतलीवर जिवंत अळ्या वळवळताना आढळल्याने ग्राहकाला धक्का बसला. संबंधित उत्पादनावरील बॅच/बारकोड क्रमांक 8906151422017 असल्याचे नमूद आहे. मिठाईतील हा किळसवाणा प्रकार निदर्शनास येताच ग्राहकाने तात्काळ अन्न व औषध प्रशासनाकडे (FDA) तक्रार नोंदवली.

### FDA पथकाची रिलायन्स मॉलवर धडक

तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने तात्काळ पावले उचलली. अन्न सुरक्षा अधिकारी जि. के. वसावे यांच्या नेतृत्वाखाली एफडीएच्या पथकाने बुलढाण्यातील रिलायन्स मॉलवर थेट धाड टाकली. पथकाने घटनास्थळी पोहोचून संबंधित काजूकतलीच्या तुकड्यांची आणि मॉलमध्ये उपलब्ध असलेल्या संपूर्ण मिठाईच्या साठ्याची पाहणी केली.

# मी पुन्हा येणार; धर्मेंद्र प्रधान

## मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी पहिल्यांदाच सोडले मौन

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**नीट पेपर लीग प्रकरणी कॉक्रोज जनता पार्टीने तत्कालीन शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याविरूद्ध मोठं आंदोलन केलं होतं. आधी राजीनामा सोडून बोला असं म्हणणाऱ्या सरकारला धर्मेंद प्रधान यांचा राजीनामा घ्यावा लागाला. राजीनाम्यानंतर ज्यावेळी पहिल्यांदा धर्मेंद्र प्रधान हे संसदेत आले त्यावेळी त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.**



सरकारमधील काही नेत्यांकडून देशविघातक शक्तींपासून देशाला वाचवण्यासाठी धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा त्याग केला असे बिंबवण्याचा प्रयत्न झाला. मात्र हे उघडे पडू लागल्यावर सारवा सारव करण्यात आली. आता धर्मेंद्र प्रधान यांनी जेन झींबाबत मोठ मोठी वक्तव्ये करून पलटी मारली आहे.

भाजपचे वरिष्ठ नेते आणि संबलपूरचे खासदार धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी भुवनेश्वरच्या जीएम विद्यापीठात विद्यार्थी आणि शिक्षकांशी संवाद साधला. त्यावेळी बोलताना त्यांनी राजीनामा का दिला याबाबत पहिल्यांदाच सार्वजनिक वक्तव्य केलं.

ते म्हणाले, 'जेन झी ही आपलीच मुले आहेत. त्यांची कोणीतरी दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारतात दर वर्षी कमीत कमी २ कोटी मुलं जन्माला येतात. गेल्या दहा वर्षात २० कोटी मुले जन्माला आली आहेत. त्यांच्या काही महत्वकांक्षा आहेत. ते सर्व भारताला विश्व गुरू बनवणार. माझ्या दृष्टीने पद महत्वाचे नाही.'

देश पातळीवर विरोध झाल्यानंतर आता माजी शिक्षण मंत्री प्रधान यांना त्यांच्या राज्यात देखील विरोधाचा सामना करावा लागत आहे. स्थानिक पक्ष बीजेडीच्या कार्यकर्त्यांनी जवळपास सर्व कार्यक्रमात प्रधान यांचा विरोध करणं सुरू केलं आहे. रायराखोल मधील अशाच एका कार्यक्रमात प्रधान यांच्याविरूद्ध बीजेडीच्या कार्यकर्त्यांनी तुफान घोषणाबाजी केली.

याला प्रत्युत्तर देताना प्रधान यांनी 'या घोषणांनी मी व्यथित होत नाही. मी एक शेतकऱ्याचा मुलगा आहे. तुम्ही मला परत जायला सांगत आहात मात्र मी परत जाणार नाही मी पुन्हा येणार.' असे वक्तव्य केलं. त्याचबरोबर नवीन पटनायक हे युवकांना त्यांच्याविरूद्ध भडकवत आहेत असा देखील आरोप केला. त्यांनी मी कधीही लोकांना माझी लाज वाटेल असं काम केलेलं नाही असं सांगितलं.

### नवीन पटनायक यांच्यावर आरोप

धर्मेंद्र प्रधान यांनी बिजू जनता दलाचे अध्यक्ष नवीन पटनायक यांच्यावर तरुणांना आपल्या विरोधात भडकवल्याचा आरोप केला. ते म्हणाले, "नवीन बाबू मला ओडिशाच्या जनतेसाठी कलंक आणि एक वाईट माणूस म्हणतात. मी कधी असे काही केले आहे का, ज्यामुळे ओडिशाच्या जनतेला लाज वाटेल?" सभेतील गर्दीने एकमुखाने 'नाही' असे उत्तर दिले. ते म्हणाले, माझ्या कामाने जनतेला कधीही लाज आणली नाही. मी असे काहीही करणार नाही, ज्यामुळे राज्याच्या प्रतिष्ठेला डाग लागेल.

# इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांची प्रकृती गंभीर

**महाईन्यूज । इराण**

**इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे वृत्त समोर आल्यानंतर नव्या नेतृत्वाबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे वृत्त समोर आल्यानंतर इराणच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. पश्चिम आशियातील संघर्षाच्या सुरुवातीला अमेरिकन आणि इस्रायली हल्ल्यात त्यांचे वडील अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर मोजतबा यांनी देशाची धुरा सांभाळली होती.**



मात्र आता त्यांच्याही आरोग्याबाबत विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत.

जर ते सर्वोच्च नेत्याचे पद सांभाळण्यास असमर्थ ठरले किंवा त्यांचा मृत्यू झाला तर इराणचे नेतृत्व कोणाकडे जाणार? या प्रश्नाने इराण आणि जागतिक राजकारणाचे लक्ष वेधले आहे.

इस्रायलची वृत्तवाहिनी चॅनेल १४ ने दिलेल्या माहितीनुसार, मोजतबा खामेनी यांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. तर इतर काही आंतरराष्ट्रीय अहवालांमध्ये त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. तथापि इराणच्या अधिकृत यंत्रणांनी किंवा कोणत्याही स्वतंत्र स्रोताने या वृत्ताला दुजोरा दिलेला नाही. सर्वोच्च नेतेपद स्वीकारल्यापासून मोजतबा हे सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष समोर आलेले नाहीत. यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबतच्या संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. इराणच्या संविधानानुसार सर्वोच्च नेत्याचे पद रिकामे झाल्यास नव्या नेत्याची निवड होईपर्यंत विशेष व्यवस्था केली जाते. संविधानातील कलम १११ नुसार सर्वोच्च नेत्याचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांनी राजीनामा दिल्यास किंवा ते कारभार पाहण्यास असमर्थ ठरल्यास तीन सदस्यांची तात्पुरती परिषद देशाचा कारभार हाती घेते.

या परिषदेमध्ये इराणचे विद्यमान अध्यक्ष मसूद पेझेश्कियान, न्यायपालिकेचे प्रमुख गुलाम हुसेन मोहसेनी आणि गार्डियन कौन्सिलचे एक धार्मिक कायदेतज्ज्ञ यांचा समावेश होऊ शकतो. मोज्ताबा हे त्यांचे वडील आयोतुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर इराणचे सर्वोच्च लीडर झाले होते. अमेरिका आणि इस्त्रायलने २८ फेब्रुवारी रोजी केलेल्या हल्ल्यात आयोतुल्ला अली खामेनींचे निधन झाले होते.

### नवी निवड कोण करणार?

इराणच्या सर्वोच्च नेत्याची औपचारिक निवड करण्याची घटनात्मक जबाबदारी ८८ सदस्यांच्या असेंबली ऑफ एक्सपर्ट्स या संस्थेकडे असते. सर्वोच्च नेत्याकडे इराणचे सैन्य, न्यायव्यवस्था, परराष्ट्र धोरण आणि इतर सर्व प्रमुख सरकारी संस्थांचे सर्वाधिकार असतात. त्यामुळे हे पद रिकामे झाल्यास लवकरात लवकर नवीन नेत्याची निवड करणे या असेंबलीसाठी बंधनकारक असते. सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत मोजतबा खामेनी यांच्या अनुपस्थितीमुळे इराणच्या राजकीय भविष्याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध शक्यता वर्तवल्या जात आहेत. काही इस्त्रायली माध्यमांनी तर मोज्ताबा हे गंभीर असून कधीही मरू शकतात असे रिपोर्टिंग करणं सुरू केलं.

# प्राजक्ता माळीने घेतला मोठा निर्णय!

मराठी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी नेहमीच विविध कारणांमुळे चर्चेत असते. 'जुळून येती रेशीमगाठी' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली प्राजक्ता सध्या 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. आज (८ ऑगस्ट) ती तिचा ३७वा वाढदिवस साजरा करत असून, यानिमित्ताने तिने सोशल मीडियावरून पोस्ट करत एक महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. वाढदिवसानिमित्त प्राजक्ताने मुंबईतील श्री



सिद्धिविनायक मंदिर आणि तळजाई मातेचे दर्शन घेतले. मंदिराबाहेरील फोटो सोशल मीडियावर शेअर करत तिने यापुढे पूर्णपणे व्हिगन जीवनशैली स्वीकारण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. मात्र हा निर्णय स्वेच्छेने नव्हे, तर आरोग्याच्या कारणास्तव घ्यावा लागल्याचेही तिने स्पष्ट केले. पोस्टमध्ये प्राजक्ता म्हणाली, "आज सकाळी श्री सिद्धिविनायक आणि आई तळजाई मातेचे दर्शन घेतले. याच क्षणी मी पूर्णपणे व्हिगन होण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय मी स्वखुशीने नाही, तर नाईलाजाने घेत आहे. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमुळे मला वारंवार कफाचा त्रास होत आहे. त्यामुळे यापुढे मी चहा किंवा कॉफीला नकार दिला, तर त्याचे आश्चर्य वाटून घेऊ नका. तामसिक पदार्थांना माझे शरीर नकारात्मक प्रतिसाद देत आहे. त्यामुळे आता मी क्रूरता-मुक्त जीवनशैली स्वीकारत आहे. मात्र काही खोटारड्या व्यक्तींसाठी नाही," असे तिने मिश्कील शैलीत नमूद केले. प्राजक्ताच्या या निर्णयाचे चाहत्यांकडून मोठ्या प्रमाणात स्वागत होत असून, अनेकांनी तिच्या पोस्टवर वाढदिवसाच्या शुभेच्छांसह नव्या प्रवासासाठी शुभेच्छाही दिल्या आहेत. प्राजक्ता तिच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याबाबत नेहमीच जागरूक असल्याचे दिसून येते. ती अनेकदा बंगळुरू येथील 'आर्ट ऑफ लिव्हिंग' आश्रमाला भेट देत असते. व्यस्त शूटिंग शेड्यूलमधून वेळ काढत योग, सात्त्विक आहार, ध्यान आणि मौनव्रत यांसारख्या गोष्टींवर ती भर देताना दिसते. काही दिवसांपूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत तिने नॉनव्हेज आहारापासून दूर राहिल्याचेही सांगितले होते.



# किलर लूकने सारेच घायाळ

अखेर 'टॉक्सिक: अ फेअरी टेल फॉर ग्रोन-अप्स' या बहुचर्चित चित्रपटाचा दमदार ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. ट्रेलर पाहून सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. अनेकांनी ट्रेलरचे कौतुक केले आहे, तर अनेकांनी ट्रेलरची तुलना रणबीर कपूरच्या ॲनिमल चित्रपटासोबत केली आहे. काहींनी ट्रेलर पाहून चित्रपटातील हिंसकपणाची तीव्रता अधिक असल्याचे म्हटले आहे. थोडक्यात चित्रपटाच्या ट्रेलरला घेऊन विविध स्वरुपाच्या प्रतिक्रिया समोर येते आहेत. अशातच ट्रेलरमध्ये केवळ एक छोटीशी झलक दाखवण्यात आलेल्या एका अभिनेत्रीची जोरदार चर्चा सर्वत्र रंगली आहे. खरंतर या चित्रपटात नयतारा, हुमा कुरेशी, कियारा अडवाणी, रुक्मिणी वसंत आघाडीच्या अभिनेत्रींच्या दमदार भूमिका आहेत. मात्र, अभिनेत्री संजिदा शेखने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. गीतू मोहनदास दिग्दर्शित 'टॉक्सिक: अ फेअरी टेल फॉर ग्रोन-अप्स' हा चित्रपट यशच्या मोठ्या चित्रपटांपैकी एक आहे. येत्या २६ ऑगस्ट २०२६ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या ॲक्शन-पॅक चित्रपटाच्या ट्रेलरमधील अनेक शॉट्समध्ये संजिदाचा कॅमिओ दिसत आहे. निर्मात्यांनी अद्याप तिच्या पात्राबद्दल कोणताही तपशील उघड केलेला नाही, त्यामुळे चित्रपटातील तिची भूमिका अस्पष्ट आहे.




# स्पायडर-मॅनचा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ

हॉलिवूडचा लोकप्रिय सुपरहिरो स्पायडर-मॅन पुन्हा एकदा भारतीय प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. टॉम हॉलंड स्टारर 'Spider-Man: Brand New Day' या चित्रपटाने रिलीजच्या पहिल्याच दिवसापासून बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाईला सुरुवात केली आणि अवघ्या काही दिवसांतच मोठ्या कमाईच्या क्लबमध्ये प्रवेश केला आहे. 30 जुलै रोजी भारतात प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाची प्रेक्षकांमध्ये सुरुवातीपासूनच प्रचंड उत्सुकता होती. टॉम हॉलंड पुन्हा पीटर पार्करच्या भूमिकेत दिसणार असल्याने चाहत्यांमध्ये विशेष क्रेझ पाहायला मिळाली. चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकिंगलाही जबरदस्त प्रतिसाद मिळाला होता. रिलीज झाल्यानंतर या उत्सुकतेचे रूपांतर बॉक्स ऑफिसवरील विक्रमी कमाईत झाले. भारतात चित्रपटाने पहिल्या आठवड्यातच 400 कोटींच्या आसपास कमाई केली. नवव्या दिवशीही चित्रपटाचा वेग कायम राहिला आणि एकूण भारतीय कमाई सुमारे 417 कोटींवर पोहोचल्याचे ताज्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या यशामुळे 'Spider-Man: Brand New Day' हा भारतातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या हॉलिवूड चित्रपटांच्या शर्यतीत वेगाने पुढे आला आहे. विशेष म्हणजे 'Avengers: Endgame'सारख्या मोठ्या हॉलिवूड चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस विक्रमालाही हा चित्रपट आव्हान देत असल्याचे ट्रेड रिपोर्ट्समध्ये सांगितले जात आहे. चित्रपटाच्या यशामागे केवळ स्पायडर-मॅनची लोकप्रियता नाही, तर टॉम हॉलंडची भूमिका, मार्व्हल सिनेमॅटिक युनिव्हर्सशी जोडलेली कथा आणि भारतात असलेला या सुपरहिरोचा मोठा चाहतावर्ग हीदेखील महत्त्वाची कारणं मानली जात आहेत. चित्रपट इंग्रजीसोबत हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नड भाषांमध्येही प्रदर्शित झाला आहे. भारतामध्ये या चित्रपटाची सुरुवात मोठी झाली होती. रिलीजपूर्व ॲडव्हान्स बुकिंगमध्येही मोठ्या प्रमाणावर तिकिटांची विक्री झाली होती. त्यामुळे चित्रपट मोठा ओपनिंग वीकेंड देणार असल्याचा अंदाज आधीपासूनच व्यक्त केला जात होता.

# मला खूप राग आला होता

## संजय मांजरेकरशी भारताचा माजी खेळाडू बरीच वर्षे बोलत नसल्याचा खुलासा

**महाईन्यूज । लंडन**

**स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जाणारे माजी भारतीय क्रिकेटपटू संजय मांजरेकर अनेकदा वादाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. त्यांच्या तीक्ष्ण टीकेमुळे अनेकांना त्रास झाला आहे, अगदी भारतीय क्रिकेटपटूही याला अपवाद राहिलेले नाहीत. अशीच एक टीकेमुळे भारतीय संघाच्या दिग्गज खेळाडूला वाईट वाटलं होतं. त्या खेळाडूला इतकं वाईट वाटलं होतं की त्याने मांजरेकरांशी अनेक वर्षे बोलणंच बंद केलं होतं.**





भारताचे माजी खेळाडू संजय मांजरेकरांच्या अनेक वक्तव्यावरून मोठा गदारोळ झालेला पाहायला मिळाला आहे. त्यांचे लेख किंवा कॉमेंट्रीदरम्यान केलेल्या वक्तव्यांमुळे त्यांना मोठ्या प्रमाणात चाहत्यांनी ट्रोलदेखील केलं आहे. तर दरम्यान बऱ्याच वर्षांपूर्वीची एक घटनादेखील समोर आली आहे. भारताचा माजी खेळाडू रविचंद्रन अश्विन अशाच एका टीकेमुळे बरीच वर्षे त्यांच्याशी बोलला नव्हता.

अश्विनने खुलासा केला की ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या दौऱ्यावरून परतताना त्याने मांजरेकरांचा एक मोठा लेख वाचला. त्या लेखात त्याच्या फिटनेसवर कठोर टीका करण्यात आली होती. जिओहॉटस्टारवरील मुलाखतीत अश्विन म्हणाला, “मी ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या दौऱ्यावरून परतत होतो. विमानात संजय मांजरेकरांचा एक मोठा लेख वाचला. तो पूर्ण वाचल्यानंतर मला खूप राग आला. राग येणं एक गोष्ट आहे, पण मला खूप वाईटही वाटलं. मी ते मनात ठेवून दिलं. काही काळ मी त्यांच्याशी फारसं बोलतही नव्हतो.”

मात्र त्याने ही नाराजी मनात साठवून न ठेवता स्वतःला बदलण्यासाठी वापरली. अश्विन पुढे म्हणाला, “पुढची चार वर्षे मी स्वतःवर खूप मेहनत घेतली. मी नैसर्गिकरित्या मोठा ॲथलीट नव्हतो. नंतर २०१५ मध्ये त्यांनी पुन्हा एक लेख लिहिला आणि माझ्या गोलंदाजीचं कौतुक केलं. तेव्हा मी त्यांचा नंबर शोधून त्यांना मेसेज केला की तुमच्या त्या जुन्या लेखाने माझं आयुष्य बदललं. मी टीकेतून काही शिकण्यासारखं आहे का, हे नेहमी पाहतो.”

अश्विनने डिसेंबर २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. भारताला कसोटी क्रिकेटमधील बलाढ्य संघ बनवण्यात त्याचा मोठा वाटा होता. त्याने १०६ कसोटींमध्ये २४ च्या सरासरीने ५३७ विकेट्स घेतल्या. ११६ एकदिवसीय सामन्यांत १५६ विकेट्स, तर ६५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत ७२ विकेट्स त्याच्या नावावर आहेत. फलंदाजीतही त्याने महत्त्वपूर्ण योगदान दिलं. कसोटी क्रिकेटमध्ये त्याने ३,५०३ धावा केल्या असून त्यात सहा शतकं आणि १४ अर्धशतकांचा समावेश आहे. अश्विनच्या मते, मांजरेकरांच्या त्या टीकेने त्याला खचवण्याऐवजी स्वतःमध्ये सुधारणा करण्याची प्रेरणा दिली आणि त्याच्या कारकिर्दीला नवी दिशा मिळाली.

### मेजर लीगमध्ये सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्सचेही प्रतिनिधित्व

आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि आयपीएलमधून निवृत्तीनंतरही अश्विन टी-२० स्पर्धांमध्ये खेळताना दिसतो. २०२६ तमिळनाडू प्रीमियर लीगमध्ये तो डिंडीगुल ड्रॅगन्सकडून खेळला, तर यंदा मेजर लीग क्रिकेटमध्ये सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्सचेही प्रतिनिधित्व केले. मात्र गुडघ्याच्या दुखापतीमुळे त्याचा सहभाग केवळ एका सामन्यापुरता मर्यादित राहिला. सध्या अश्विन समालोचन आणि यूट्यूबवरील विश्लेषणात्मक कार्यक्रमांमधूनही सक्रिय आहे आणि भारतीय क्रिकेटमधील मोठ्या घडामोडींवर नियमितपणे आपलं मत मांडताना दिसतो.

# GOAT चा टॅग सचिनचा नाही तर द. अफ्रिकेच्या दिग्गज खेळाडूचा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**सचिन तेंडुलकरला संपूर्ण क्रिकेट विश्व हे क्रिकेटचा देव म्हणून ओळखते. मात्र ऑस्ट्रेलियन खेळाडू सचिनला त्याचा हक्काचा ग्रेटनेस देताना देखील कुचकेपणा करतात हा इतिहासात आहे. याच इतिहासाची पुनरावृत्ती माजी वेगवान गोलंदाज ब्रेट लीने केली आहे.**



ब्रेट लीने सचिन तेंडुलकरला क्रिकेटचा GOAT अर्थात ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाईम मानण्यास नकार दिला. किमान भारतीयांसाठी तरी सचिन तेंडुलकर म्हणजे क्रिकेट आणि क्रिकेट म्हणजेच सचिन तेंडुलकर हे समीकरण कित्येक दशके राहिले आहे. असं असताना देखील ब्रेट लीने GOAT चा टॅग देताना सचिनच्या वर दक्षिण अफ्रिकेचा अष्टपैलू खेळाडू जॅक कॅलिसची निवड केली यासाठी त्याने अनेक उदाहरणे देखील दिली आहे.

तब्बल २४ वर्षे आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणाऱ्या सचिन तेंडुलकरच्या नावावर अनेक विक्रम आहेत. तसेच त्याच्या नावावर १०० आंतरराष्ट्रीय शतके देखील ठोकण्याचा विक्रम आहे. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक सामने खेळळे तसेच दोन्ही प्लॅटफॉर्ममध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम देखील त्याच्याच नावावर आहे. एकूण आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा देखील त्याच्याच नावावर आहेत. तो जगातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक फलंदाज आहे.

### सचिन महान फलंदाज

ब्रेट ली हा सचिन तेंडुलकविरूद्ध बराच काळ खेळला आहे. तो म्हणतो की दीर्घ काळ सचिन तेंडुलकर हा सर्वोत्तम फलंदाज म्हणून गणला गेला. मी देखील त्याला सर्वोत्तम फलंदाज मानत होतो. मात्र फलंदाजीच्या पुढे ज्यावेळी गोलंदाजी आणि फिल्डिंगबाबत बोलायचं असेल त्यावेळी ब्रेट लीच्या मते कॅलिस सचिनपेक्षा जास्त सरस आहे. बीअरबायसेप्स पॉडकास्टमध्ये बोलताना ली म्हणाला की, मला नेहमी असं वाटतं की क्रिकेटचा सर्वोत्तम फलंदाज हा सचिन तेंडुलकर आहे. मात्र सर्वात चांगला क्रिकेटर हा जॅक कॅलिस आहे. त्याच्याकडे जगातील सर्वात चांगले नंबर्स आहेत. त्याचे स्टॅट तुम्ही पाहिले तर ते खोटं बोलत नाहीत.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। सोमवार ।
दि. 10 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

OPEN MINDS.
EXPLORE IDEAS.
SHAPE TOMORROW.

BA
LIBERAL ARTS

THE FREEDOM TO EXPLORE.
THE POWER TO CREATE CHANGE.

A multidisciplinary degree that encourages curiosity, builds perspective and prepares you for a world of possibilities.

GLOBAL PERSPECTIVE
Understand the world.

CRITICAL THINKING
Question. Analyze. Evolve.

COMMUNICATION
Express ideas with impact.

INTERDISCIPLINARY LEARNING
Connect concepts. Create solutions.

DIVERSE CAREER PATHS
Endless opportunities await.



SCAN QR TO APPLY


+91-8600091180
admission@dypiu.ac.in
www.dypiu.ac.in

# डीपीवर ५६,७७९ हरकती; सुनावणी सुरू

## १७ आरक्षणांवरच ३७ हजारांहून अधिक आक्षेप; वर्षभराच्या विलंबानंतर नागरिकांच्या हरकतींवर सुनावणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रारूप सुधारित विकास आराखड्यावर (डीपी) दाखल झालेल्या तब्बल ५६ हजार ७७९ हरकतींवर अखेर सुनावणी सुरू झाली आहे. वर्षभराच्या विलंबानंतर ३ ऑगस्टपासून सुनावणी प्रक्रियेला सुरुवात झाली असून, शहरातील विविध प्रस्तावित आरक्षणे आणि रस्ते रुंदीकरणाच्या मुद्द्यांवर नागरिक, शेतकरी आणि जागामालकांनी मोठ्या प्रमाणात आक्षेप नोंदवले आहेत.**




### निर्णयाकडे शहराचे लक्ष

डीपीवर दाखल झालेल्या ५६ हजार ७७९ हरकती हा शहराच्या नियोजन प्रक्रियेतील मोठा आकडा आहे. विशेषतः १७ आरक्षणांवरच ३७ हजारांहून अधिक आक्षेप आल्याने संबंधित प्रस्तावांबाबत नागरिकांचा तीव्र विरोध स्पष्ट झाला आहे.

विशेष म्हणजे, डीपीतील केवळ १७ आरक्षणांवर ३७ हजार ४७९ हरकती दाखल झाल्या आहेत. त्यामुळे या हरकतींवर सुनावणी समिती नेमका काय निर्णय घेणार, प्रस्तावित आरक्षणांमध्ये बदल होणार का आणि नागरिकांच्या आक्षेपांना कितपत न्याय मिळणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

पिंपरी येथील भीमसृष्टीशेजारील म्युनिसिपल पर्पज, पोलिस स्टेशन आणि बस टर्मिनलचे आरक्षण, तसेच तळवडे, थेरगाव, चिंचवड, पिंपरी आणि वाकड येथील १८ व २४ मीटर रस्ते रुंदीकरणावर मोठ्या प्रमाणात हरकती दाखल झाल्या आहेत.

याशिवाय चिखली, किवळे आणि सांगवी येथील दफनभूमी, मोशीतील कत्तलखाना, चऱ्होलीतील स्टेडियम, एचसीएमटीआर अर्थात रिंगरोड मार्ग तसेच पूररेषेबाबतही नागरिकांनी मोठ्या संख्येने आक्षेप नोंदवले आहेत.

डीपीमध्ये अनेक ठिकाणी चुकीच्या पद्धतीने आरक्षणे प्रस्तावित करण्यात आल्याचा आरोप नागरिक, शेतकरी आणि जागामालकांकडून करण्यात आला. जमिनींवर प्रस्तावित करण्यात आलेली आरक्षणे, रस्ते रुंदीकरण आणि विविध विकास प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मालमत्तांबाबत नागरिकांनी हरकती नोंदवल्या.

### २८ गावांचा आराखडा

पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रासोबतच पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून महापालिकेकडे वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्राचा एकत्रित प्रारूप सुधारित विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यात शहरातील २८ गावांचा १७३.२४ चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश आहे. शहराच्या भविष्यातील विकासासाठी विविध आरक्षणे, सार्वजनिक सेवा-सुविधा आणि नवीन प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम २६ (१) अन्वये पिंपरी-चिंचवड शहर आणि विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्राचा प्रारूप सुधारित विकास आराखडा १४ मे २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता.

१५ मे २०२५ ते १४ जुलै २०२५ या ६० दिवसांच्या मुदतीत तब्बल ५६ हजार ७७९ हरकती दाखल झाल्या. एवढ्या मोठ्या प्रमाणातील हरकतींमुळे डीपीवरील नागरिकांचा रोष स्पष्टपणे समोर आला आहे.

हरकती दाखल झाल्यानंतर तब्बल वर्षभराने त्यावर सुनावणी सुरू झाली आहे. ३ ऑगस्ट २०२६ पासून सुनावणी प्रक्रियेला सुरुवात झाली असून, मोठ्या संख्येने आलेल्या हरकतींवर एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे. या सुनावणीसाठी सात सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. समिती नागरिकांच्या हरकती, आक्षेप आणि संबंधित बाबींचा विचार करून आपला निर्णय देणार आहे.

दरम्यान, एवढ्या मोठ्या संख्येने हरकती दाखल झाल्या असल्या तरी प्रत्यक्ष सुनावणीला उपस्थित राहणाऱ्या हरकतदारांची संख्या तुलनेने कमी असल्याचे दिसून येत आहे.

सुमारे २,५०० नागरिकांना सुनावणीसाठी नोटिसा देण्यात आल्यानंतर केवळ १५० ते २०० जण प्रत्यक्ष उपस्थित राहत आहेत. वर्षभराच्या विलंबानंतर सुनावणी सुरू झाल्याने नागरिकांमध्ये प्रक्रियेबाबत अपेक्षित उत्साह दिसून येत नसल्याचे चित्र आहे.

आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात ही सुनावणी प्रक्रिया सुरू असून, ती नोव्हेंबर २०२६ पर्यंत चालणार आहे.

# एक महिन्याचा वारी प्रवास पूर्ण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आषाढी वारी सोहळा पूर्ण करून संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा आज आळंदी नगरीत दाखल झाला. तब्बल महिनाभराचा पायी प्रवास, लाखो वारकऱ्यांची साथ, टाळ-मृदंगाचा गजर आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने दुमदुमलेला वारीचा प्रवास आज माऊलींच्या आळंदीच्या समाधी मंदिरात विसावला.**



आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या माऊलींच्या पालखी सोहळ्याने विविध मुक्काम आणि टप्पे पार करत आषाढी एकादशीला पंढरपुरात प्रदक्षिणा मार्गाने विठ्ठल-रखुमाईच्या मंदिराला प्रदक्षिणा पूर्ण करत... पौर्णिमेला विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेत. परतीचा प्रवास सुरू झाला. पंढरपूरहून पुन्हा आळंदीच्या दिशेने निघालेल्या माऊलींच्या पालखी सोहळ्यात हजारो वारकरी सहभागी झाले होते.

महिनाभराच्या या भक्तिमय प्रवासात ऊन, पाऊस, चिखल आणि विविध अडचणींची पर्वा न करता वारकऱ्यांनी माऊलींच्या चरणी आपली सेवा अर्पण केली. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि भगव्या पताकांनी सजलेला वारीचा मार्ग पुन्हा एकदा भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला.

आता माऊलींच्या पालखीचे आळंदीत आगमन झाल्याने आषाढी वारीच्या या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक प्रवासाची सांगता झाली आहे. महिनाभराचा खडतर प्रवास पूर्ण करून माऊली पुन्हा आपल्या आळंदीत दाखल झाल्याने वारकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# अडीच वर्षांत ९८० बळी; तरी अपघातांना 'ब्रेक' नाही..!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय हद्दीत गेल्या अडीच वर्षांत (२०२४ ते जुलै २०२६) ९३५ प्राणांतिक अपघातांमध्ये तब्बल ९८० जणांचा मृत्यू झाला आहे. म्हणजेच दररोज सरासरी एकाहून अधिक नागरिकांना रस्त्यावर जीव गमवावा लागत आहे. राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावरील 'ब्लॅक स्पॉट', भरधाव वेग, वाहतूक नियमांचे उल्लंघन, अवजड वाहनांची बेफिकीर वाहतूक आणि काही ठिकाणी खड्डे, रस्त्यांची दुरवस्था यामुळे अपघातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असल्याचे चित्र आहे.

पिंपरी-चिंचवड हद्दीतील महामार्ग सर्वाधिक धोकादायक मार्ग ठरत आहेत. औद्योगिक पट्टा, आयटी कंपन्या, अवजड वाहतूक आणि दिवस-रात्र सुरू असलेली वाहनांची प्रचंड वर्दळ यामुळे या मार्गांवरील अपघातांची संख्या वाढत असल्याचे पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेचे निरीक्षण आहे. या मार्गांवर अपघातप्रवण ठिकाणे (ब्लॅक स्पॉट) आहेत. काही ठिकाणी तीव्र वळणे, अपुरी प्रकाशयोजना, रस्त्यांवरील खड्डे, चुकीचे कट, सेवारस्त्यांचा अभाव आणि अचानक रस्ता ओलांडणारे पादचारी यामुळे अपघातांना निमंत्रण मिळते.

# सात वर्षे, तीन आश्वासने, शून्य प्रगती?

## पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पावरून खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या पाठपुराव्यावर प्रश्नचिन्ह!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शिरूर लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्याकडे 2019 पासून सलग दोनदा जनतेने कौल दिला. सात वर्षांच्या या कार्यकाळात पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे हा त्यांच्या मतदारसंघातील सर्वांत महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा प्रकल्प राहिला. मात्र इतक्या प्रदीर्घ काळानंतरही हा प्रकल्प प्रत्यक्षात मार्गी लागलेला नाही, यावरून आता स्थानिक पातळीवर नाराजीचा सूर उमटू लागला आहे. या भागातील नागरिक सोशल मीडियावर तिखट प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत.**




केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याशी सातत्याने संपर्कात असूनही, खासदार अमोल कोल्हे यांना पुणे-नाशिक रेल्वे महामार्गासाठी प्रतीक्षा करावी लागते. राज्य सरकार आणि केंद्र सरकार अशा दोन्ही पातळीवर कोल्हे यांनी पाठपुरावा करणे आवश्यक आहे. केवळ पत्र व्यवहार करुन चालणार नाही, तर रस्त्यावर उतरुन आंदोलनात सहभागी झाले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

गेल्या काही वर्षांत डॉ. कोल्हे यांनी जीएमआरटीमुळे निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीवर तोडगा काढावा, अशी मागणी पंतप्रधान कार्यालय आणि केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान खात्याकडे वारंवार केली. आंदोलनाचे आवाहनही त्यांनी स्थानिक शेतकरी व तरुणांना केले. मात्र या सर्व प्रयत्नांनंतरही प्रकल्पाचा मूळ प्रश्न वर्षानुवर्षे 'जैसे थे' राहिला. रेल्वे मंत्रालयाने काही काळापूर्वी मूळ मार्गाला परवानगी नाकारल्याचेही वृत्त समोर आले होते, ज्यामुळे स्थानिक जनतेच्या आशा-अपेक्षांना मोठा धक्का बसला.

डॉ. कोल्हे यांच्या पाठपुराव्याच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित करणारे आणखी एक उदाहरण म्हणजे नाशिक फाटा ते खेड हा एलिव्हेटेड कॉरिडॉर. हा मार्ग मंजूर झाला, तेव्हा याचे श्रेय घेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे आपणच पाठपुरावा केल्याचा दावा डॉ. कोल्हे यांनी सोशल मीडियावर केला होता, असे सांगितले जाते. मात्र आता हाही प्रकल्प भूसंपादनातील अडचणींमुळे रखडला असून, याची गंभीर दखल घेत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने प्रकल्पात होणाऱ्या विलंबाबाबत थेट इशारा दिल्याचे वृत्त आहे. याचा थेट फटका चाकण औद्योगिक पट्ट्यातील नागरिकांना बसत असून, त्यांना रोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर काही नेटिझन्सकडून डॉ. कोल्हे यांच्यावर टीका होत असल्याचे दिसते — प्रत्यक्ष निकाल दाखवण्याऐवजी केवळ सभागृहातील भाषणबाजी आणि सोशल मीडियावरील टिप्पण्यांपुरताच त्यांचा पाठपुरावा मर्यादित राहतो, असा सूर या टीकेत आहे.

शिरूर मतदारसंघात डॉ. कोल्हे यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी राहिलेले शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासह अन्य विरोधकांनी या मुद्द्यावरून त्यांना यापूर्वीही लक्ष्य केले आहे. गेल्या दोन लोकसभा निवडणुकांत डॉ. कोल्हे विजयी झाले असले, तरी कनेक्टिव्हिटीसारख्या मूलभूत प्रश्नावर मतदारसंघाला ठोस निकाल न मिळाल्याने आगामी काळात हा मुद्दा त्यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या अडचणीचा ठरू शकतो, असे विश्लेषकांचे मत आहे. राज्य सरकारने डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली नव्याने तज्ज्ञ समिती स्थापन केली असून, या समितीच्या अहवालानंतर तरी प्रकल्पाला गती मिळेल का, याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

### तांत्रिक अडथळा नेमका काय?

प्रकल्प रखडण्यामागील मूळ कारण तांत्रिक आहे. मूळ प्रस्तावित मार्ग जुन्नर तालुक्यातील खोडद येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी) या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वेधशाळेच्या नजीकून जातो. रेल्वे संचालनातून निर्माण होणाऱ्या विद्युत-चुंबकीय हस्तक्षेपाचा (इलेक्ट्रोमॅग्नेटिक इंटरफिअरन्स) परिणाम जीएमआरटीच्या संवेदनशील रेडिओ खगोलशास्त्रीय निरीक्षणांवर होऊ शकतो, अशी आपत्ती अणुऊर्जा विभाग व विज्ञान-तंत्रज्ञान विभागाने घेतली. जीएमआरटीची स्थापना 1996 मध्ये झाल्यापासूनच या परिसरात औद्योगिकीकरणावर निर्बंध असल्याने रेल्वेसारख्या मोठ्या पायाभूत प्रकल्पाला परवानगी मिळण्यात अडचणी येत आहेत.

### यावर आजवर पुढे आलेले तांत्रिक पर्याय:

- **मूळ मार्गावर तांत्रिक उपाययोजना** — विद्युत-चुंबकीय हस्तक्षेप रोखण्यासाठी विशेष शिल्डिंग किंवा तांत्रिक यंत्रणा वापरणे, अशी मागणी डॉ. कोल्हे यांनी केली होती.
- **जीएमआरटीचे स्थलांतर** — कमी लोकसंख्येच्या भागात वेधशाळा हलवावी, हा पर्यायही त्यांनी सुचवला होता; मात्र जीएमआरटीसाठी विशिष्ट भौगोलिक स्थान (कर्कवृत्ताजवळ) आवश्यक असल्याने हा पर्याय व्यवहार्य ठरलेला नाही.
- **मार्गात बदल** — रेल्वे मंत्रालयाने अहिल्यानगर आणि शिर्डीमार्गे सुधारित मार्ग प्रस्तावित केला, पण राज्य सरकारला मूळ आराखडाच अधिक व्यवहार्य वाटतो, कारण बदललेल्या मार्गामुळे अंतर व खर्च वाढू शकतो आणि मूळ भागातील कनेक्टिव्हिटीचा हेतू साध्य होत नाही.

# लोणावळ्यात 'आखाड' पार्ट्यांचा जल्लोष; पर्यटनस्थळे गजबजली

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आखाड पार्ट्या करण्यासाठी लोणावळा शहरात पर्यटकांची मोठी गर्दी झाली आहे. पर्यटकांच्या या गर्दीमुळे शहरातील सर्व पर्यटनस्थळे गजबजली असून, हॉटेल, फार्महाऊस व खासगी बंगले पर्यटकांनी भरले आहेत.**



पुढील आठवड्यामध्ये श्रावण महिना सुरू होणार आहे. हा महिना सुरू होण्यापूर्वी आखाड पार्ट्या सर्वत्र जोरात चालतात. पर्यटनस्थळ असलेल्या लोणावळा शहर व आजूबाजूच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड व अन्य भागांमधून पर्यटक दाखल झाले आहेत. अनेक तरुण-तरुणींचे ग्रुप खासगी बंगल्यांमध्ये मुक्कामी आहेत.

या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आखाड पार्ट्या रंगल्या असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. लोणावळा शहरामध्ये दीडशेहून अधिक लहान-मोठी हॉटेल्स आहेत. तर, हजारो बंगले आहेत. बंगल्यांमध्ये फार नियमांचे पालन करावे लागत नसल्यामुळे पर्यटक हॉटेलमध्ये राहण्याऐवजी खासगी बंगल्यांना प्राधान्य देत आहेत. या ठिकाणी स्विमिंग पूलमध्ये भिजण्याचा आनंद घेत पार्ट्या रंगत आहेत.

### पोलिस बंदोबस्त तैनात

शहरातील वाहतूक कोंडी नियंत्रणात ठेवण्यासाठी व पर्यटनस्थळांवर सुरक्षिततेसाठी पुणे ग्रामीण पोलिसांकडून पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लोणावळा शहर पोलिस तसेच ग्रामीणचे पोलिस कर्मचारी हेदेखील वाहतूक नियंत्रण व पर्यटनस्थळांवर कायदा व सुव्यवस्थेसाठी तैनात आहेत. मात्र, पर्यटकांची व पर्यटकांच्या वाहनांची संख्या मोठी असल्यामुळे वाहतूक नियोजन कोलमंडले आहे. पर्यटनस्थळांवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता पोलिस तैनात आहेत.

DTE Code
**6310**

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |



Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**

Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507